प्रेसनोट दिनांक ३०/०८/२०१८

**मोबाईल फोन हिसकावणारे दोन सराईत जेरबंद एक लाख सत्तर हजाराचा माल हस्तगत**

दिनांक २५/०८/२००१८ रोजी पुणे शहर गुन्हे शाखेकडील संघटीत गुन्हेगारी विरोधी पथक दक्षिण विभागाचे प्रमुख पोनिरी श्री. राम राजमाने यांचे मार्गदर्शनाखाली स्टाफसह पेट्रोलिंग फिरत असताना पोलीस कर्मचारी रमेश चौधर व निलेश शिवतरे यांना त्यांचे खब-याकडुन मिळालेल्या माहीतीवरुन पोलीसांनी डीपी रोड एरंडवणा पुणे या भागात सापळा लावुन संशयीत इसम आकाश संजय गायकवाड वय २१ रा मुपो धानोरे गनोबा मंदिरासमोर शिरुर पुणे व त्याचा साथीदार प्रदिप बाळासाहेब भोसुरे वय २१ रा सदर यांना पकडले त्यांचे ताब्यात मिळुन आलेल्या बजाज पल्सर मोटार सायकल व मोबाईल फोनबाबत खात्रीशीर माहीती सांगीतली नाही म्हणुन त्यांना मोटारसायकल व मोबाईल फोनसह त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

आरोपींना विश्वासात घेवुन तपास करता त्यांनी शिरुर, वाघोली, शिक्रापुर, रांजनगाव एमआयडीसी या भागामध्ये रात्रौ व दिवसाच्या वेळे मध्ये मोबाईल फोनवर बोलणा-या इसमांकडील मोबाईल फोन हिसका मारुन चोरल्याचे तपासात निष्पण्ण झाले आहे व चोरलेले मोबाईल फोन त्यांनी आपले ओळखीचे लोकांजवळ दिल्याचे माहीती पोलीसांना दिली आहे. त्यानुसार पोलीसांनी तपास करुन त्यांचे ताब्यातुन एकुण बारा अॅन्ड्रॉईड मोबाईल फोन त्यामध्ये नोकीया, सॅमसंग, ओपो, एम आय, विवो, लिनोवो या ब्रँडेड कंपनीचे मोबाईल फोन व मोटार सायकल असा एकुण अंदाजे एक लाख सत्तर हजार रुपयाचा माल हस्तगत करण्यात आलेला आहे. पुणे शहरातील मोबाईल फोन जबरदस्तीने चोरुन नेल्याचे उघडकीस आलेले आहे. **आरोपी गुन्हा करण्यासाठी पल्सर मोटार सायकलचा वापर करत होते ती व बारा मोबाईल फोन असा एकुण एक लाख सत्तर हजार रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.**

आरोपी अशाप्रकारे ब-याच दिवसापासुन गुन्हे करत आहे परंतु तो पोलीसांना सापडत नव्हते. **आरोपींकडुन जप्त करण्यात आलेले मोबाईल फोन चोरीबाबत चंदननगर पोलीस स्टेशन पुणे, शिक्रापुर पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण याठिकाणी गुन्हे दाखल आहेत**. इतर मोबाईल फोन त्यांनी वेगवेगळया दहा ठिकाणाहुन हिसका मारुन चोरल्याचे सांगीतले आहे. त्याबाबत पोलीस तपास करत आहेत. मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी सो क्रंमाक १५ पुणे यांचे न्यायालयात आरोपींना हजर केले असता त्यांनी दिनांक ०१/०९/२०१८ रोजी पर्यंत पोलीस कोठडी ठेवण्याचे आदेश दिलेले आहेत.

दरम्यान दिनांक २८/०८/२०१८ रोजी गुंडाज स्क्वॉड पश्चिम गुन्हे शाखा पुणे येथील पोलीसांना खब-याकडुन मिळालेल्या माहीतीवरुन कामगार पुतळा शिवाजीनगर पुणे यापरिसरात सापळा लावुन **पिंपरी भागातील सराईत गुंड धम्मपाल माणिक पालखे वय १९ रा यशवंतनगर पीसीएमसी स्कुलजवळ पिंपरी पुणे यास प्राणघातक शस्त्रासह पकडले आहे.** तो निगडी पोलीस स्टेशन व पिंपरी पोलीस स्टेशन पुणे येथील दंगा, मारामारी, दुखापत, अपहरण करणे या सारख्या गंभीर स्वरुपाच्या तीन गुन्हयामध्ये फरारी आहे तसेच त्याचेविरुध्द यापुर्वी पिंपरी पोलीस स्टेशन पुणे याठिकाणी खुनाचा एक, दरोडा एक, गंभीर दुखापत एक असे तीन गुन्हे दाखल आहेत त्यास निगडी पोलीस स्टेशन पुणे येथील पोलीसांनी ताब्यात घेतले आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रदिप देशपांडे सो अपर पोलीस आयुक्त, गुन्हे पुणे शहर, श्री. शिरीष सरदेशपांडे पोलीस उप आयुक्त, गुन्हे श्री. समीर शेख सपोआ, गुन्हे १, यांचे मार्गदर्शनाखाली गुंडा स्कॉड पश्चिम गुन्हे शाखा पुणे चे प्रमुख पोलीस निरीक्षक श्री.राम राजमाने व पोलीस उप निरी श्री.संजय गायकवाड, सहायक पोलीस फौजदार राजेंद्रसिंग चौहान, पो हवा. शकील शेख, संतोष क्षिरसागर, सर्फराज शेख, सुनिल चिखले, विजय गुरव, अजय उत्तेकर, किरण ठवरे, प्रविण पडवळ, कैलास सांळुके, निलेश शिवतरे, संभाजी गंगावणे यांनी केली आहे.

पोलिस निरीक्षक